कर्नाटक सरकार

# मराठी सरिता

## तृतीय भाषा पाठ्यपुस्तक

### इयत्ता 7 वी

# MARATHI SARITA

**Third Language Textbook**

**Part - 1**

**7**

**Standard**

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**KARNATAKA TEXT BOOK SOCIETY (R.)**

6th Cross, Malleshwaram
Bangalore - 560 003.

# ಮುನ್ನುಡಿ

2005ನೇ ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಪಠ್ಯಕ್ರಮದ ಆಧಾರದ ಮೇಲೆ ರಚಿತವಾದ ಕರ್ನಾಟಕ ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯವಸ್ತುವಿನ ಆಧಾರದ ಮೇಲೆ ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘವು 2010ನೇ ಸಾಲಿನಿಂದ ಒಂದನೇ ತರಗತಿಯಿಂದ ಹತ್ತನೇತರಗತಿವರೆಗಿನ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ರಚನಾ ಕಾರ್ಯದಲ್ಲಿ ತೊಡಗಿದೆ. ಒಟ್ಟು ಹನ್ನೊಂದು ಭಾಷಾ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಹಾಗೂ ಕೋರ್ ವಿಷಯಗಳನ್ನು 7 ಮಾಧ್ಯಮಗಳಲ್ಲಿ ರಚನೆ ಮಾಡಲಾಗುತ್ತಿದೆ. 1 ರಿಂದ 4ನೇ ತರಗತಿಯವರೆಗೆ ಪರಿಸರ ವಿಜ್ಞಾನ ಮತ್ತು 5ರಿಂದ 10ನೇ ತರಗತಿಯವರೆಗೆ ಕೋರ್ ವಿಷಯಗಳಾದ ಗಣಿತ, ವಿಜ್ಞಾನ ಮತ್ತು ಸಮಾಜ ವಿಜ್ಞಾನ ವಿಷಯಗಳಿರುತ್ತವೆ.

**2005ರ ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕವು ಈ ಕೆಳಗಿನ ವೈಶಿಷ್ಟ್ಯಗಳನ್ನು ಹೊಂದಿದೆ.**

- ಕಲಿಕೆಯನ್ನು ಜೀವನದ ಅವಶ್ಯಕತೆಗಳಿಗೆ ಜೋಡಿಸುವುದು.
- ಕಂಠಪಾಠ ವಿಧಾನದಿಂದ ಕಲಿಕೆಯನ್ನು ಮುಕ್ತಗೊಳಿಸುವುದು.
- ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಹೊರತಾಗಿ ಪಠ್ಯಕ್ರಮವನ್ನು ಶ್ರೀಮಂತಗೊಳಿಸುವುದು.
- ಜ್ಞಾನದ ಅಭಿವೃದ್ಧಿಗೆ ಕಲಿಕಾ ಅನುಭವಗಳನ್ನು ಬಳಸುವುದು.
- ಭಾರತದ ಪ್ರಜಾಸತ್ತಾತ್ಮಕ ನೀತಿಯನ್ವಯ ಮಕ್ಕಳ ಅವಶ್ಯಕತೆಗಳಿಗೆ ತಕ್ಕಂತೆ ಸ್ಪಂದಿಸುವುದು.
- ಶಿಕ್ಷಣವನ್ನು ಇಂದಿನ ಹಾಗೂ ಭವಿಷ್ಯದ ಜೀವನಾವಶ್ಯಕತೆಗಳಿಗೆ ಹೊಂದುವಂತೆ ಮಾಡುವುದು.
- ವಿಷಯಗಳ ಮೇರೆಗಳನ್ನು ಮುರಿದು ಅವುಗಳ ಸಮಗ್ರದೃಷ್ಟಿಯ ಬೋಧನೆಯನ್ನು ಅಳವಡಿಸುವುದು.
- ಶಾಲೆಯ ಹೊರಗಿನ ಬದುಕಿಗೆ ಜ್ಞಾನ ಸಂಯೋಜನೆ.
- ಮಕ್ಕಳಿಂದಲೇ ಜ್ಞಾನವನ್ನು ಅಭಿವೃದ್ಧಿ ಪಡಿಸುವುದು.

**ನೂತನ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಕೆಳಗಿನ ಮೂಲಭೂತ ವಿಧಾನಗಳ ಆಧಾರದ ಮೇಲೆ ರಚಿಸಲಾಗಿದೆ.**

- ಅಂತರ್ಗತ ವಿಧಾನ (Intergrated Approach),
- ರಚನಾತ್ಮಕ ವಿಧಾನ (Constructive Approach),
- ಸುರುಳಿಯಾಕಾರದ ವಿಧಾನ (Spiral Approach),

ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ವಿಷಯ ಹಾಗೂ ಅಭ್ಯಾಸಗಳು ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳನ್ನು ಯೋಚನೆ ಮಾಡುವಂತೆ ಮಾಡಿ, ಚಟುವಟಿಕೆಗಳ ಮೂಲಕ ಜ್ಞಾನ ಹಾಗೂ ಸಾಮರ್ಥ್ಯಗಳನ್ನು ಪಡೆಯುವಂತೆ ಮಾಡುವ ಪ್ರಯತ್ನ ಮಾಡಲಾಗಿದೆ. ಪಠ್ಯವಸ್ತುಗಳೊಂದಿಗೆ ಅತ್ಯಂತ ಅವಶ್ಯಕ ಭಾರತೀಯ ಜೀವನ ಮೌಲ್ಯಗಳನ್ನು ಅಂತರ್ಗತವಾಗಿ ಬಳಸಲಾಗಿದೆ. ಈ ನೂತನ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳು ಪರೀಕ್ಷಾಪೂರಕ ದೃಷ್ಟಿಯಿಂದ ರಚಿತವಾಗಿಲ್ಲ. ಬದಲಾಗಿ ಅವುಗಳು ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳ ಸರ್ವಾಂಗೀಣ ವ್ಯಕ್ತಿತ್ವ ವಿಕಸನಕ್ಕೆ ಪೂರಕವಾಗಿವೆ. ತನ್ಮೂಲಕ ಅವರನ್ನು ಸ್ವತಂತ್ರ ಭಾರತದ ಸ್ವಸ್ಥ ಸಮಾಜದ ಉತ್ತಮ ಪ್ರಜೆಗಳನ್ನಾಗಿ ಮಾಡುವ ಪ್ರಯತ್ನ ನಡೆದಿದೆ.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

ಭಾಷಾಕಲಿಕೆಯಲ್ಲಿ ಅತ್ಯಂತ ಮುಖ್ಯ ಗುರಿಗಳಾದ ಆಲಿಸುವುದು, ಮಾತನಾಡುವುದು, ಓದುವುದು, ಬರೆಯುವುದು ಹಾಗೂ ಆಕರಗ್ರಂಥಗಳಿಂದ ವಿಷಯ ಸಂಗ್ರಹಣೆಯಂತಹ ಕ್ಷೇತ್ರವಾರು ಸಾಮರ್ಥ್ಯಗಳಿಗೆ ಒತ್ತು ನೀಡಲಾಗಿದೆ. ಈ ಕೌಶಲ್ಯಗಳೊಂದಿಗೆ ಕ್ರಿಯಾತ್ಮಕ ವ್ಯಾಕರಣ, ಸೌಂದರ್ಯಪ್ರಜ್ಞೆ, ಪ್ರಶಂಸಾ ಮನೋಭಾವ, ಮೌಲ್ಯಗಳ ಸಂವರ್ಧನೆ ಹಾಗೂ ಮಕ್ಕಳ ಅಭ್ಯಾಸ ಪುಸ್ತಕಗಳಲ್ಲಿ ಅನೇಕ ಚಟುವಟಿಕೆಗಳನ್ನು ಮಕ್ಕಳಿಂದ ಮಾಡಿಸಿ ಅವರಲ್ಲಿ ಸಂಬಂಧಪಟ್ಟ ಸಾಮಥ್ಯ ಸಂವರ್ಧನೆಗೆ ಅನುವು ಮಾಡಿಕೊಡಬೇಕು. ಈ ಸಾಮರ್ಥ್ಯ ಮಕ್ಕಳಲ್ಲಿ ಬಂದಾಗ ಅವರು ಪರೀಕ್ಷೆಗಳಿಗಾಗಿ ಕಂಠಪಾಠಕ್ಕೆ ಶರಣು ಹೋಗಬೇಕಾಗಿಲ್ಲ. ಪಠ್ಯಪುಸ್ತಕವು ಭಾಷಾ ಕೌಶಲ್ಯಗಳ ಸಂವರ್ಧನೆಗೆ ಒಂದು ಪೂರಕವಸ್ತುವೆಂದು ಪರಿಗಣಿಸಲು, ಮಕ್ಕಳ ಮನೋವೈಶಾಲ್ಯವನ್ನು ಬೆಳೆಸಲು ವಿಷಯಗಳಿಗೆ ಸಂಬಂಧಿಸಿದಂತೆ ಅನೇಕ ಚಟುವಟಿಕೆಗಳನ್ನು ಪಠ್ಯಪುಸ್ತಕದಲ್ಲಿ ಒದಗಿಸಲಾಗಿದೆ. ಮಿತ್ರರೊಂದಿಗೆ ಗುಂಪುಗಳಲ್ಲಿ ಚರ್ಚೆಯ ಮೂಲಕ ಅವರ ಅಭಿವ್ಯಕ್ತಿ ಹಾಗೂ ಸಂವಹನ ಕೌಶಲ್ಯಗಳ ಸಂವರ್ಧನೆಯೇ ಕಲಿಕೆ ಗುರಿಯೆಂದು ಅಂತಹ ಚಟುವಟಿಕೆಗಳಿಗೆ ಹೆಚ್ಚಿನ ಪ್ರಾಮುಖ್ಯತೆಯನ್ನು ನೀಡಲಾಗಿದೆ. ಈ ರೀತಿಯ ಚಟುವಟಿಕೆಗಳು ಮಕ್ಕಳಲ್ಲಿ ಕಲಿಯುವ ಕಲೆ (learning to learning) ಹಾಗೂ ಕಲಿತುದುದನ್ನು ಜೀವನದಲ್ಲಿ ಅಳವಡಿಸುವ ಶಕ್ತಿ (learning to do), ಯನ್ನು ಮಕ್ಕಳಲ್ಲಿ ವೃದ್ಧಿಮಾಡುತ್ತದೆ. ಪ್ರತಿ ಘಟಕದಲ್ಲಿಯೂ ಕೆಲವು ಜೀವನ ಮೌಲ್ಯಗಳನ್ನು ಅಂತರ್ಗತವಾಗಿ ಜೋಡಿಸಲಾಗಿದೆ.

ಬೆಳಗಾವಿ ಹಾಗೂ ಕಲಬುರಗಿ ವಿಭಾಗದ ಸ್ಥಳೀಯರ, ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳ, ಪೋಷಕರ ಆಸಕ್ತಿ ಹಾಗೂ ಅಪೇಕ್ಷೆಯ ಮೇರೆಗೆ 2022ನೇ ಶೈಕ್ಷಣಿಕ ಸಾಲಿನಿಂದ ಮರಾಠಿ ಭಾಷೆಯನ್ನು ತೃತೀಯ ಭಾಷೆಯಾಗಿ ಕಲಿಸುವ ಉದ್ದೇಶದಿಂದ 7ನೇ ತರಗತಿ ಮರಾಠಿ–ಸರಿತ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕವನ್ನು ನೂತನವಾಗಿ ರಚಿಸಿ ಮುದ್ರಿಸಲಾಗಿದೆ. ಇದರ ಸಂಪೂರ್ಣ ಪ್ರಯೋಜನವನ್ನು ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳು ಹಾಗೂ ಭಾಷಾಸಕ್ತರು ಪಡೆಯುವರೆಂಬ ವಿಶ್ವಾಸವನ್ನು ಸಂಘವು ಹೊಂದಿದೆ.

ಈ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕದ ರಚನೆಯಲ್ಲಿ ಸಹಕರಿಸಿದ ಸಮಿತಿಯ ಅಧ್ಯಕ್ಷರಿಗೆ, ಸದಸ್ಯರಿಗೆ, ಕಲಾವಿದರಿಗೆ, ಪರಿಶೀಲಕರಿಗೆ, ಸಂಪಾದಕ ಮಂಡಳಿಯ ಸದಸ್ಯರುಗಳಿಗೆ ಮತ್ತು ಜಿಲ್ಲಾ ಶಿಕ್ಷಣ ಮತ್ತು ತರಬೇತಿ ಸಂಸ್ಥೆ, ಬೆಳಗಾವಿರವರಿಗೆ, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘವು ಹೃತ್ಪೂರ್ವಕ ಕೃತಜ್ಞತೆಗಳನ್ನು ಸಲ್ಲಿಸುತ್ತದೆ. ಈ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕವನ್ನು ಇನ್ನಷ್ಟು ಉತ್ತಮಗೊಳಿಸುವ ನಿಟ್ಟಿನಲ್ಲಿ ರಚನಾತ್ಮಕ ಸಲಹೆಗಳನ್ನು ಸಂಘವು ಹೃತ್ಪೂರ್ವಕವಾಗಿ ಸ್ವಾಗತಿಸುತ್ತದೆ.


**ಶ್ರೀ ಎಂ.ಪಿ. ಮಾದೇಗೌಡ**
ವ್ಯವಸ್ಥಾಪಕ ನಿರ್ದೇಶಕರು
ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ, ಬೆಂಗಳೂರು


©KTBS NOT TO BE REPUBLISHED

# हितगुज

राष्ट्रीय अभ्यासक्रम चौकट 2005 आधारभूत मानून व बदलत्या शिक्षण पद्धतीतील आधुनिक संकल्पना गृहीत धरून 'मराठी सरिता' या इयता 7 वी साठीच्या तृतीयभाषेच्या पाठ्यपुस्तकाची निर्मिती करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांचे वय, त्यांची बौद्धिक पातळी तसेच त्यांचे मराठी भाषेविषयीचे ज्ञान लक्षात घेऊन पाठांची निर्मिती व निवड करण्यात आली आहे. सोप्यापासून कठीणतेकडे हा कल लक्षात घेऊन पाठांची क्रमवारी करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांच्या मराठी शिकण्याच्या ओढीसोबत पारंपरिक व आधुनिक विषयांची सांगड घालत, विद्यार्थ्यांमध्ये जीवनमूल्ये रुजविण्याच्यादृष्टीने प्रस्तुत पुस्तकामध्ये प्रयत्न केलेला आहे.

प्राथमिक व्याकरणाचा भाग, बोधकथा, कविता, संभाषण, विनोदी कथा, आत्मवृत्त, निबंध, प्रवासवर्णन, नवीन तंत्रज्ञानाविषयी माहिती यांसारख्या गोष्टींना वाव देणाऱ्या पाठ्यप्रकारांची निवड करण्यात आली आहे. पाठांसह उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांची सृजनशीलता वाढावी, त्यांच्या बुद्धीला चालना मिळावी यादृष्टीने प्रयत्न केला आहे.

विद्यार्थ्यांच्या जीवनात भाषाशिक्षणास महत्त्वपूर्ण स्थान आहे. यासाठी श्रवण, भाषण, वाचन, लेखन व संभाषण तसेच क्रियात्मक व्याकरण या भाषा विकासाच्या पाच क्षेत्रांचा समावेश केलेला आहे. त्याचबरोबर अभ्यासक्रम, वर्गखोलीतील कार्य, गृहपाठ, उपक्रम याद्वारे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी संधी देण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, सौजन्य, सहिष्णुता, प्रामाणिकपणा, देशप्रेम, सहकार्य, कृतज्ञता, स्वसाहाय्य, स्वच्छता, भक्ती, प्रेम, मानवता अशा जीवनमूल्यांचा विकास व्हावा, विद्यार्थ्यांची भाषाभिवृद्धी व्हावी तसेच मराठी भाषा, मराठी संस्कृतीचे संवर्धन करण्याचा अल्प प्रयत्न करण्यात आला आहे.

एन.सी.एफ. 2005 मधून प्रतिभासंपन्न विद्यार्थ्यांच्या निर्मितीचा पाया घालण्यात आला आहे. या प्रयत्नांमध्ये पाठ्यपुस्तक हे एक साधन आहे. सदर पाठ्यपुस्तकात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी समाजातील सर्व स्तरांतील सुजाण नागरिक, शिक्षक बंधुभगिनी व पालकांच्या बहुमूल्य सूचनांचे पाठ्यपुस्तक निर्देशनालयात मनःपूर्वक स्वागत आहे.

या पाठ्यपुस्तक निर्मिती कार्यात श्री एम्. एम्. सिंधूर, प्राचार्य डायट बेळगांवी व समन्वय अधिकारी श्रीमती सुजाता एस. बाळेकुंद्री, प्राध्यापिका डायट मण्णूर यांचे अमूल्य मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ सर्वांचे अत्यंत आभारी आहे.

**पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ**

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## Text Book Committee

***Chairman :***

**Dr. Snehal J. Patil,** Asst. Teacher, Sou Bhagirathibai Shah Kanya Shala, Nipani, Dist- Belagavi-Chikkodi.

***Members :***

**Shri Pranav L. Bhatakande,** Asst. Teacher, Govt. MHPS, No. 29, Ramadev Galli, Belagavi.

**Shri Vishwas R. Gawade,** Asst. Teacher, Balika Adarsha Vidyalaya, Tilakwadi, Belagavi.

**Shri Raju V. Mane,** Asst. Teacher(GPT), Govt. MHPS, Tarihal, Block Belagavi rural Dist- Belagavi.

**Shri Yuvaraj K. Patil,** Asst. Teacher, Smt. Lilavati Venkatesh Karguppikar High School, Agasage, Tal- Belagavi.

***Scrutinizer :***

**Shri Jotiba D. Birje,** Asst. Teacher, Maratha Mandal High School, Khanapur, Dist-Belagavi.

***Artist :***

**Shri Raju Shankar Bades,** Drawing Teacher, P.J.N. High School, Kalloli, Tal-Mudaligi, Dist-Belagavi.

***Editorial Board Members :***

**Dr. Vinod Gaikwad,** Chairman, Marathi Section, R.C.U. Belagavi.

**Dr. Manisha Nesarkar,** Chairman, Marathi Section, R.C.U. Belagavi.

***Co-ordination :***

**Shri M. M. Sindhur,** Principal / DDPI (Dev) DIET, Mannur, Belagavi.

**Smt. Sujata S. Balekundri,** Lecturer, DIET, Belagavi.

***Chief Advisers :***

**Sri M. P. Madegowda,** Managing Director, KTBS, Bengaluru.

**Smt M. D. Usha,** Deputy Director, KTBS, Bengaluru.

***Programme Co-Ordinator***

***L SHANKARE GOWDA,*** Asst. Director, KTBS, Bengaluru.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# अनुक्रमणिका

B1C9Y4


| अ.नं. | पाठाचे/कवितेचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| 1. | पुन:स्मरण | 4 |
| 2. | आहे तुझे आभाळ (प्रार्थना) | 13 |
| 3. | पाढे | 16 |
| 4. | बडबडे कासव | 20 |
| 5. | मौज महिन्यांची-गंमत सणांची (कविता) | 26 |
| 6. | सायकल म्हणते, 'मी आहे ना!' | 33 |
| 7. | उठा राष्ट्रवीर हो (कविता) | 42 |
| 8. | राष्ट्रीय शौर्य पुरस्कार | 46 |
| 9. | प्राण्यांचा आजार (कविता) | 55 |
| | पूरक वाचन | 64 |
| | **यक्षगान** | 64 |
| | **गोमू माहेरला जाते** | 65 |


@KTBS NOT TO BE REPUBLISHED

चित्र पहा. चित्रात काय काय दिसते ते सांगा.



# माझे पान

**या पानावर तुमच्या आवडीचे चित्र काढा.**

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

## नेहमी लक्षात ठेवा.



दरीत डोकावून पाहू नका, जीव धोक्यात घालू नका.
भररस्त्यात गाडी थांबवू नका, इतरांना जाण्यासाठी व्यत्यय आणू नका.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



शिस्त, नियम पाळूया; पोहण्याचा आनंद घेऊया.
सर्वांग सुंदर व्यायाम पोहण्याचा, आळस जाईल तनामनाचा.

# पाठ - 1

# पुनःस्मरण

L2D5H4

## I. वर्णमाला पूर्ण करा.

### स्वर

### व्यंजन

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## II. खालील शब्दातील स्वर ओळखून त्याला गोल करा.

उदा : आई

| | | | |
|---|---|---|---|
| आगगाडी | ऑफीस | एडका | अंबारी |
| ओठ | ऐरण | ऊस | उखळ |

## III. खालील शब्द वाचा व जसेच्या तसे लिहा-

| | | |
|---|---|---|
| शतक | लसूण | सावकाश |
| पाळणा | शेजारी | काशिनाथ |
| चिवडा | दौलत | शाबासकी |

| | | |
|---|---|---|
| पालखी ☐ | चंदन ☐ | दुकानदार ☐ |
| गुलाब ☐ | दु:ख ☐ | आक्रमक ☐ |
| जाडजूड ☐ | पंढरपूर ☐ | बॅट ☐ |
| आलेपाक ☐ | कृषक ☐ | चॉकलेट ☐ |
| चौकीदार ☐ | शहामृग ☐ | कॅडबरी ☐ |

## IV. चित्र पहा, शब्द वाचा व जसेच्या तसे लिहा.


म्हैस ☐


इस्त्री ☐


छप्पर ☐


अस्वल ☐


कुऱ्हाड ☐


व्यायाम ☐


कथ्थक ☐


नृत्य ☐


घड्याळ ☐


शर्ट ☐


ट्रक ☐


बर्फ ☐

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

## V. खालील वाक्ये वाचा व लिहा.

1) दादा नक्कल करतो. ____________________

2) राजू रोज व्यायाम कर. ____________________

3) तू कोणत्या जिल्ह्यात राहतोस ? ____________________

4) करंजी हा गोड पदार्थ आहे. ____________________

5) गावात जत्रा भरते.____________________

6) ईश्वराला परमेश्वर असेही म्हणतात. ____________________

7) राष्ट्रगीताचा नेहमी आदर करावा. ____________________

8) पृथ्वी गोलाकार आहे. ____________________

9) कृतज्ञ असावे. ____________________

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

## VI. खालील चौदाखडी पूर्ण करा.

| क | का | कि | की | कु | कू | के | कॅ | कै | को | कॉ | कौ | कं | कः |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ठ | | | | | | | | | | | | | |
| फ | | | | | | | | | | | | | |
| ल | | | | | | | | | | | | | |
| ष | | | | | | | | | | | | | |
| ळ | | | | | | | | | | | | | |
| क्ष | | | | | | | | | | | | | |
| ज्ञ | | | | | | | | | | | | | |

## VII.पुढील चित्रे पाहून शब्दकोडे पूर्ण करा.

(1)

(2)

(3)

(4)

(5)





@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

## VIII.आवश्यक चिन्हे देऊन शब्द अर्थपूर्ण करा.

.(अनुस्वार), : (विसर्ग)

1) अनत = ______ 2) दुख = ______

3) सुगधी = ______ 4) उच = ______

5) रग = ______ 6) पतग = ______

**IX. अक्षरांची योग्य जुळणी करून शब्द तयार करा व लिहा.**

1) मा स णू = ☐

2) ध्या का सं ळ = ☐

3) अ ण ड च = ☐

4) गा मु ल = ☐

**X. खालील इंग्रजी अंक मराठी अंकात व शब्दात लिहा.**

| इंग्रजी अंक | मराठी अंक | शब्द |
|---|---|---|
| 21 | | |
| 32 | | |
| 47 | | |
| 18 | | |
| 49 | | |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**XI. खालील अक्षरे योग्य प्रकारे जुळवून शब्द तयार करून लिहा आणि मोठ्याने वाचा.**

1) र म्य स र्ग नि ____________

2) क्र म आ क ____________

3) र्य ट प न ____________

4) ट गु गु त टी ____________

5) भा सु प्र त ____________

## XII. खालील झाडातील अक्षरे पाहून त्यापासून शब्द तयार करा.




| | |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |

NOT TO BE REPUBLISHED

## XIII. आरशात पाहून शब्द ओळखा.



______________________ ______________________

______________________ ______________________

## XIV. फरक समजून घ्या व पुन्हा लिहा.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1) | ख | स | | | 2) | ङ | ड | | |
| 3) | च | ज | | | 4) | ट | ठ | | |
| 5) | ड | इ | | | 6) | त | न | | |
| 7) | ध | घ | | | 8) | प | ष | | |
| 9) | भ | म | | | 10) | थ | य | | |

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**XV. 'र' चे योग्य जोडाक्षर लिहून खालील शब्द लिहा.**

1) खच =

2) पेम =

3) चक =

4) राष्ट =

5) टक =

6) कज =

7) बफी =

8) चंदभागा=

9) सकस =

10) वज =

## वाचूया, लिहूया

**XVI. शब्द वाचा व लिहा.**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क्र | चक्र | | क्रिकेट | | क्रमांक | | विक्रम | |
| श्र | श्रम | | श्रावण | | श्रीमंती | | श्रीधर | |
| र्थ | अर्थ | | विद्यार्थी | | प्रार्थना | | तीर्थरूप | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| म्ह | आम्ही | | म्हैस | | म्हणाला | | तुम्हाला | |
| त्स | वत्सला | | उत्सव | | उत्साह | | संवत्सर | |
| स्व | स्वर | | स्वाती | | स्वागत | | स्वामी | |
| न्ह | चिन्ह | | उन्हाळा | | तान्हा | | कान्हा | |
| श्च | पश्चिम | | आश्चर्य | | निश्चित | | निश्चय | |
| ष्ठ | ज्येष्ठ | | निष्ठा | | पृष्ठ | | श्रेष्ठ | |
| च्च | सच्चा | | कच्चा | | गच्ची | | उच्चार | |

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

# मराठी वर्णमाला

## स्वर

अ आ इ ई उ ऊ ऋ ऌ ए अॅ

ऐ ओ ऑ औ

## स्वरादी

अं अः

## व्यंजने

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क् | ख् | ग् | घ् | ङ् |
| च् | छ् | ज् | झ् | ञ् |
| ट् | ठ् | ड् | ढ् | ण् |
| त् | थ् | द् | ध् | न् |
| प् | फ् | ब् | भ् | म् |
| य् | र् | ल् | व् | श् |
| ष् | स् | ह् | ळ् | |

## संयुक्त व्यंजने (जोडाक्षरे)

क्ष्, ज्ञ्

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

F5M1F2

# पाठ - 2

# आहे तुझे आभाळ



© KTBS NOT TO BE REPUBLISHED

आहे तुझे आभाळ देवा तुझीच माती
हे चंद्र, सूर्य, तारे आम्हा प्रकाश देती ।।धृ।।

पानां, फुलांफळांनी, बहरुन वृक्ष येती
मंजूळ पाखरेही, गातात सुप्रभाती ।।1।।

जोडोनी हात सारे, विनवू प्रभू पदाला
बाळे तुझीच आम्ही, सांभाळ बालकांना ।।2।।

बल-बुद्धी दे आम्हांला, चुकता करी क्षमा रे
या सान बालकांना, मिळू दे तुझी कृपा रे ।।3।।

## नवीन शब्दार्थ :

आभाळ = आकाश, वृक्ष = झाड, प्रकाश = उजेड,
प्रभात = सकाळ, प्रभू = देव, कृपा = आशीर्वाद,
क्षमा = माफ करणे, सान = लहान, बल = शक्ती.

## अभ्यास

### अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

1) आम्हाला प्रकाश कोण देतो ?
2) सुप्रभातीची गाणी कोण गात आहेत ?
3) हात जोडून मुले देवाकडे कोणती विनंती करीत आहेत ?
4) देवाची कृपा कोणाला मिळू दे ?

### आ) समानार्थी शब्द लिहा.

1) आभाळ =
2) चंद्र =
3) सूर्य =
4) वृक्ष =

### इ) विरूद्धार्थी शब्द लिहा.

1) देव ×
2) प्रकाश ×
3) बहरणे ×
4) मंजूळ ×
5) सान ×

### ई) खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा.

1) पाना, फुलांफळांनी ____________________
2) जोडोनी हात सारे ____________________

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

3) बाळे तुझीच आम्ही ____________________

4) या सान बालकांना ____________________

## उ) अक्षरे योग्य प्रकारे लावा व अर्थपूर्ण शब्द बनवा.

| | | |
|---|---|---|
| लमोतीमा | नरूहब | ल्लीवक्षवृ |
| नाकांलबा | दृष्टीपाकृ | ळभाआ |
| शकाप्र | ळजूमं | वूनवि |

## ऊ) ओळखा पाहू - मी कोण ?

✻ पहाट होताच तुम्हाला दिसतो,
तेव्हाच दिवस सुरू होतो.
लवकर उठून पाहायची
तुम्ही प्रतिज्ञा करा,
आहे सर्वात मी तेजस्वी तारा.

✻ टपोरे रूप, मोहक सुगंध
गुलाबी रंग माझा
मी आहे फुलांचा राजा.

## उपक्रम :

ही प्रार्थना शिक्षकांच्या मदतीने चालीत म्हणा आणि अशा प्रार्थनांचा संग्रह करा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**विचारधन**

दृढविश्वास हा महान कार्याचा जनक आहे.

✻✻✻

# पाठ - 3

# पाढे

I4S8L1




NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## अ) नमुन्याप्रमाणे रिकाम्या जागा भरा:

| इंग्रजी अंक | मराठी अंक | शब्दामध्ये |
|---|---|---|
| नमुना : 54 | ५४ | चोपन्न |
| 57 | | |
| 68 | | |
| 72 | | |
| 88 | | |
| 93 | | |
| 52 | | |
| 69 | | |
| 83 | | |
| 92 | | |
| 51 | | |

## आ) खालील कोष्टक पूर्ण करा :

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | | ९१ |
| | १२ | | | | | | | ८२ | |
| | | २३ | | | | | ७३ | | |
| | | | ३४ | | | ६४ | | | |
| ५ | | | | ४५ | | | | | ९५ |
| | | | | | ५६ | | | | |
| | | | ३७ | | | ६७ | | | |
| | | २८ | | | | | ७८ | | |
| | १९ | | | | | | | ८९ | |
| १० | | | | | | | | | १०० |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## इ) खालील अंक इंग्रजीत लिहा.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६१ | | ७१ | | ८१ | | ९१ | |
| ६२ | | ७२ | | ८२ | | ९२ | |
| ६३ | | ७३ | | ८३ | | ९३ | |
| ६४ | | ७४ | | ८४ | | ९४ | |
| ६५ | | ७५ | | ८५ | | ९५ | |
| ६६ | | ७६ | | ८६ | | ९६ | |
| ६७ | | ७७ | | ८७ | | ९७ | |
| ६८ | | ७८ | | ८८ | | ९८ | |
| ६९ | | ७९ | | ८९ | | ९९ | |
| ७० | | ८० | | ९० | | १०० | |

## ई) पायऱ्या चढण्यास विद्यार्थ्याला मदत करा.

पायऱ्यांवरील अंक अक्षरात लिहा.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED












## उ) क्रमदर्शक संख्या

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | - | पहिला | ६ | - | सहावा |
| २ | - | दुसरा | ७ | - | सातवा |
| ३ | - | तिसरा | ८ | - | आठवा |
| ४ | - | चौथा | ९ | - | नववा |
| ५ | - | पाचवा | १० | - | दहावा |

## ऊ) अपूर्णांकी संख्या वाचणे

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
|  | १/४ | $\frac{1}{4}$ | पाव | १ ३/४ | $1\frac{3}{4}$ | पावणे दोन |  |
|  | १/२ | $\frac{1}{2}$ | अर्धा | २ १/४ | $2\frac{1}{4}$ | सव्वा दोन |  |
|  | ३/४ | $\frac{3}{4}$ | पाऊण | २ १/२ | $2\frac{1}{2}$ | अडीच |  |
|  | १ १/४ | $1\frac{1}{4}$ | सव्वा | २ ३/४ | $2\frac{3}{4}$ | पावणे तीन |  |
|  | १ १/२ | $1\frac{1}{2}$ | दीड | ३ १/४ | $3\frac{1}{4}$ | सव्वा तीन |  |
| | | | | ३ १/२ | $3\frac{1}{2}$ | साडे तीन |  |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

***

## पाठ - 4

# बडबडे कासव

Y5I3E6



एका जंगलात एक मोठे तळे होते. तळ्यात खूप पाणी होते. तिथे दोन हंस राहत होते. भरपूर पाण्यात पोहायला, डुंबायला त्यांना खूप खूप मज्जा वाटायची. तळ्यात त्यांच्याबरोबर एक बडबडे कासव पण राहत होते. त्यांची आणि कासवाची छान गट्टी जमली होती.



एकवर्षी काय झाले दुष्काळ पडला. सर्व नद्या, नाले, तलाव कोरडे पडू लागले. पशू, पक्षी आणि माणसे मरू लागली. हंसांनी विचार केला बापरे! असे जर पाणी आटत गेले की आपले कसे होणार? या कोरड्या तळ्यात कसे दिवस काढणार?



शेवटी मग हंसांनी विचार करून दुसऱ्या भरपूर पाणी असलेल्या तळ्यामध्ये जाण्याचा निर्णय घेतला.

कासवाला ही बातमी समजताच हंसांना ते म्हणाले, ''मी पण येतो तुमच्याबरोबर. इथे एकटा राहून काय करू ?''

''अरे पण कासवा तू आमच्यासारखा हवेत उडू शकत नाहीस. काय बरे करावे?'' आता हंसांनी एक युक्ती केली. त्यांनी एक मजबूत काठी आणली.

हंस कासवाला म्हणाले, ''कासवभाऊ आम्ही ही काठी दोन्ही बाजूंनी घट्ट पकडतो. तू मध्यभागी तोंडाने घट्ट पकड. अशारीतीने आपण दूरवर खूप पाणी असलेल्या तळ्याच्या ठिकाणी जाऊया.'' कासवाला हा उपाय आवडला.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

कासवाने 'हं' म्हणून ताबडतोब मान डोलावली. ''हं, पण काही झाले तरी तोंडातील काठी सोडायची नाही बरे का !''



हंसाने पुन्हा एकदा कासवाला बजावले. झाले! काठीच्या दोन्ही बाजूला हंस आणि काठीच्या मध्यभागी



कासव अशी ही सर्कस आकाशातून उडत जात असताना गावातील लोकांनी पाहिली.

''अरे ! हे बघ कासव उडत आहे.'' हे दृश्य एकाने दुसऱ्याला, दुसऱ्याने, तिसऱ्याला दाखविले. हां हां म्हणता



खूप गर्दी जमली. लोकांनी आतापर्यंत असे कासवाला उडताना पाहिले नव्हते. त्यांना खूप मज्जा वाटली. टाळ्या वाजवून ते नाचू लागले व म्हणू लागले, ''पहा दोन पक्षी कासवाला घेऊन आकाशात उडत आहेत.''

©KTBS NOT TO BE REPUBLISHED



कासवाला वाटले; लोक आपल्यावर हसत आहेत आपली टिंगल करत आहेत. हे त्याला बिलकूल आवडले नाही. त्याला खूप राग आला. ते आपल्या रागावर नियंत्रण ठेवू शकले नाही. ते म्हणाले, ''हे मूर्ख लोक असे का ओरडत



आहेत ?'' अशाप्रकारे बोलण्यासाठी तोंड उघडताच त्याची काठीवरील पकड सुटली व ते खाली पडू लागले.

जमिनीवर पडताच कासवाचा जीव गेला.

**तात्पर्य :** कोणतेही काम करण्यापूर्वी किंवा बोलण्यापूर्वी विचार केला पाहिजे.

### नवीन शब्दार्थ

डुंबणे = पाण्यात खेळणे, गट्टी = दोस्ती, युक्ती = कल्पना
मजबूत = घट्ट, ताबडतोब = लगेच, सर्कस = कसरत
दृश्य = देखावा, बिलकूल = जराही, नियंत्रण = ताबा, टिंगल = चेष्टा

## अभ्यास

### अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

1) कासव कोठे राहात होते ?
2) कासवाचे मित्र कोण आहेत ?
3) हंसांनी कोणता निर्णय घेतला ?
4) शहरातील लोक टाळ्या वाजवून का नाचू लागले ?
5) कासवाने आपले तोंड कशासाठी उघडले ?

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

### आ) कोण कोणास म्हणाले ते लिहा.

1) ''मी पण येतो तुमच्याबरोबर.''
2) ''हे मूर्ख लोक अशाप्रकारे का ओरडत आहेत''?

### इ) खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

1) हंसांनी दुसऱ्या तळ्यात जाण्याचा निर्णय का घेतला ?
2) कासवाला घेऊन जाण्याचा कोणता उपाय हंसांनी सुचविला ?
3) शहरातील लोकांनी कोणते अद्‌भुत दृश्य पाहिले ?
4) कासवाचा जीव कसा गेला ?

### ई) वाचा व खालील शब्द योग्य क्रमाने जुळवून वाक्य अर्थपूर्ण बनवा.

उदा : 1) तळे/होते/एक/जंगलात/मोठ्ठे
वाक्य - जंगलात एक मोठ्ठे तळे होते.

## वरील प्रमाणे वाक्य बनवा.

1) एकवर्षी / पडला / काय / झाले / दुष्काळ

वाक्य :

2) मरू / पशू, पक्षी / माणसे / आणि / लागली

वाक्य :

3) हवेत / कासवा / आमच्यासारखा / तू / शकत / नाहीस / उडू

वाक्य :

4) पकडतो / बाजूंनी / घट्ट / ही काठी / दोन्ही / आम्ही

वाक्य :

5) लोकांनी आतापर्यंत असे / नव्हते / कासवाला / पाहिले / उडताना

वाक्य :

6) कासवाला / पक्षी / दोन / आकाशात / आहेत / पहा / उडत/ घेऊन

वाक्य :

7) सुटली / खाली / व तो / त्याची काठीवरील / लागला / पडू / पकड

वाक्य :

8) जमिनीवर / जीव गेला / कासवाचा / पडताच

वाक्य :

9) लोक आपल्यावर / आपली टिंगल / हसत आहेत / करत आहेत

वाक्य :

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## उ) चूक की बरोबर सांगा.

1) दुष्काळामुळे नद्या, नाले, तलाव कोरडे पडले होते. [ ]

2) हंसांनी भरपूर पाणी असलेल्या दुसऱ्या तलावात जाण्याचे ठरविले नाही. [ ]

3) हंसांनी काठीच्या मध्यभागी पकडले. [ ]

4) कासवाने रागावर नियंत्रण ठेवले नाही. [ ]

5) कासवाचा पाण्यात पडून जीव गेला. [ ]

6) कोणतेही काम करण्यापूर्वी किंवा बोलण्यापूर्वी विचार करावा. [ ]

**ऊ) खालील वाक्यांमध्ये कंसातील योग्य वाक्प्रचार वापरा व वाक्य पूर्ण करा.**

(सूचना देणे, आरडाओरड करणे, टिंगल करणे, जीव जाणे)

1) हंसांनी कासवाला तोंडात काठी घट्ट पकडण्याची __________

2) सचिन पाण्यात पडलेला पाहून आम्ही सर्वांनी __________

3) उडणाऱ्या कासवाला पाहून लोकांनी __________

4) कासवाचा जमिनीवर पडून __________

**उपक्रम :**

1) ठिपके जोडून चित्र तयार करा व रंग भरा :



© KTBS NOT TO BE REPUBLISHED

2) तुम्ही पक्षी झाला आहात अशी कल्पना करून पाच सहा ओळी लिहा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

3) चंपक व पंचतंत्रातील कथा शिक्षकांकडून ऐका.

4) शालेय परिपाठात बोधकथा, नीतिकथा वाचून दाखवा.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED



## सारे हसूया

रुग्ण - माझा एक दात खराब झाला आहे.

डॉक्टर - त्या जागी आपण दुसरा दात बसवूया.

रुग्ण - दात मात्र माझ्या दातासारखाच हवा.

डॉक्टर - ते शक्य नाही.

रूग्ण - का ?

डॉक्टर - एवढे घाणेरडे दात माझ्याकडे नाहीत.

***

E1A5A1

## पाठ - 5

# मौज महिन्यांची - गंमत सणांची

चैत्र महिन्यात गुढी उभारू
नववर्षाची सुरुवात करू ।
वैशाख साधतो मुहूर्त अक्षयतृतीयेचा
ज्येष्ठात येतो सण सौभाग्याचा।
आषाढात पंढरपुरी संतांचा मेळा
श्रावणात नागपंचमी, कृष्णाचा जन्मसोहळा ।
भाद्रपदात पुजू गणपती गौरी
आश्विनात जागवू दसरा, कोजागिरी ।
कार्तिक उजळतो लक्ष दिव्यांनी
मार्गशीर्षात वंदू दत्त चरणी ।
पौषात गोड तिळगूळ खाऊ
माघात शिवचरण पाहू ।
फाल्गुन खेळतो होळी नऊ रंगांची
बारामासातील सण, पर्वणी आनंदाची ।

- श्री जोतिबा सा. पाटील, बेळगुंदी

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**नवीन शब्दार्थ :**

मेळा = जत्रा, वंदू = नमस्कार करणे, चरण = पाय,
मास = महिना, पर्वणी = संधी, विशिष्ट योग

## अभ्यास

**अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1) मराठी महिन्यातील पहिला सण कोणता ?
2) आषाढात संतांचा मेळा कोठे भरतो ?
3) दिवाळी सण कोणत्या मराठी महिन्यात येतो ?
4) मकर संक्रांतीला कोणता गोड पदार्थ वाटतात ?
5) भाद्रपद महिन्यानंतर कोणता मराठी महिना येतो ?

**आ) खालील शब्दांना प्रासबद्ध/तालबद्ध शब्द लिहा.**

1) उभारू
2) मेळा
3) होळी
4) साधती

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**इ) इंग्रजी महिन्यांची नावे क्रमवार लिहा.**

| | | |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

## ई) जोड्या जुळवा

| | | |
|---|---|---|
| 1) | गुढीपाडवा |  |
| 2) | वटपौर्णिमा |  |
| 3) | आषाढी एकादशी |  |
| 4) | कृष्णजन्माष्टमी |  |
| 5) | नागपंचमी |  |
| 6) | गणेशोत्सव |  |
| 7) | दसरा |  |
| 8) | दिवाळी |  |
| 9) | दत्तजयंती |  |
| 10) | मकरसंक्रांत |  |
| 11) | शिवरात्र |  |
| 12) | होळी |  |

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

## उ) खालील शब्दकोड्यात लपलेल्या सणांची नावे शोधा.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | ड | भ | ग | ण | प | ती | हो | द |
| गु | ढी | पा | ड | वा | ही | का | दा | स |
| सा | रा | ना | द | त्त | ज | यं | ती | रा |
| भा | ली | दि | ष | व | ट | पौ | र्णि | मा |
| फ | खो | धी | वा | सा | शि | व | रा | त्र |
| चा | स | क | ता | ळी | हा | व | बा | गो |
| छा | ना | ग | पं | च | मी | त्र | स | प |
| टी | डू | म | क | र | सं | क्रां | त | हो |
| ळी | जा | प | छा | को | जा | गि | री | ळी |

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## ऊ) मोकळ्या जागी योग्य अक्षर लिहा व अर्थपूर्ण शब्द तयार करा.

उदा :

ब / झा क ण / री     मा / च क ली / ड     = क

1) बकरी 2) झाकण 3) माकड 4) चकली

1) चा / चि ? डा / डी     स / ग ? त / ड     =

1)     2)     3)     4)

2)




1) 2) 3) 4)

## ए ) अधिक अभ्यासासाठी माहिती.

हिंदू पंचांगाप्रमाणे महिने व त्या महिन्यात येणारे ऋतू

| | |
|---|---|
| चैत्र-वैशाख | वसंत |
| ज्येष्ठ-आषाढ | ग्रीष्म |
| श्रावण-भाद्रपद | वर्षा |
| आश्विन-कार्तिक | शरद |
| मार्गशीर्ष-पौष | हेमंत |
| माघ-फाल्गुन | शिशिर |

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## जोडाक्षरे

खालील जोडशब्दांमध्ये कोणते स्वर व कोणती व्यंजने कशा प्रकारे वापरली आहेत ते निरीक्षण करून तुम्ही तशा प्रकारे प्रयत्न करा.

उदा : चैत्र : च् + ऐ + त् + र् + अ

श्रावण : श् + र् + आ + व् + अ + ण् + अ

**प्रयत्न करा -**

1) जन्मसोहळा 2) फाल्गुन

3) सौभाग्य 4) ज्येष्ठ

## ✲ शब्दांची वर्णरचना

उदा : कृष्ण या शब्दाची वर्णरचना

कृष्ण = क् + ऋ + ष् + ण् + अ अशी आहे.

याप्रमाणे काही शब्दांची वर्णरचना

1) श्रीराम = श् + र् + ई + र् + आ + म् + अ

2) शिल्पकार = श् + इ + ल् +प् + अ + क् +आ + र् + अ

3) चित्रकार = च् + इ + त् + र् + अ + क् + आ + र् + अ

4) वटवृक्ष = व् + अ + ट् + अ + व् + ऋ + क् + ष् + अ

5) परमेश्वर = प् + अ + र् + अ + म् + ए + श् + व् + अ + र् + अ

6) प्रतापगड = प् + र् + अ + त् + आ + प् + अ + ग् + अ + ड् + अ

7) सूर्यग्रहण = स् + ऊ + र् + य् + अ + ग् + र् + अ + ह् + अ + ण् + अ

8) कुंभकर्ण = क् + अ + अनुस्वार + भ् + अ + क् + अ् + र् + ण् + अ

9) धर्मयुद्ध = ध् + अ + र् + म् + अ + य् + उ + द् + ध् + अ

10) खंडग्रास = ख् + अ + अनुस्वार + ड् + अ + ग् + र् + आ + स् + अ

11) चक्रवर्ती = च् + अ + क् + र् + अ + व् + अ + र + त + ई

12) चित्रविचित्र = च् + इ + त् + र् + अ + व + इ + च् + इ + त् + र् + अ

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

## ✲ वरीलप्रमाणे खालील शब्दांची वर्णरचना लिहून दाखवा.

| | | |
|---|---|---|
| 1) उत्तरार्ध | 2) प्रसादालय | 3) प्रावीण्य |
| 4) सत्यार्थप्रकाश | 5) पर्णकुटी | 6) ईश्वरपंडित |
| 7) चंद्रग्रहण | 8) शौर्य | 9) पराक्रम |
| 10) रणझुंझार | 11) प्रजासत्ताक | 12) स्वतंत्र |

### उपक्रम

1) 'माझा आवडता सण' या विषयावर दहा ते पंधरा ओळी निबंध लिहा.

2) तुमच्या घरी उत्साहाने साजऱ्या होणाऱ्या सणाविषयी माहिती लिहा.

3) तुमच्या कल्पनेने चित्र पूर्ण करा -



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

***

## पाठ - 6

# सायकल म्हणते, 'मी आहे ना !'

B9C1S9




मी सायकल ! काही लोक मला दुचाकी असेही म्हणतात. तसं म्हटलं तर माझा जन्म 1690 चा. फ्रान्स देशातील एम. डी. सिव्हर्क हे माझे जन्मदाते. 1876 साली गती येण्यासाठी माझ्या पेडलला साखळीची दंत तबकडी बसवली; पण मला खरा वेग आला तो रबरी टायरमुळेच. 1887 साली जॉन बॉईड डनलॉप यांनी असे टायर शोधले होते. पहिली दोनशे वर्षे मी रखडत चालले; पण त्यानंतरची शंभर दीडशे वर्षे कधी थांबलेच नाही.



© KTBS
NOT TO BE REPUBLISHED

मी तुमच्यासाठी अनेकप्रकारे लाभदायक आहे. कसे ? ते सांगते पहा. तुम्ही रोज मला नियमितपणे चालविलात तर तुम्हाला वेगळा व्यायाम करण्याची गरज नाही. घाम येईपर्यंत मला चालविल्याने तुमची फुप्फुसे अधिक कार्यक्षम होतात, मांसपेशी तंदुरुस्त राहतात. घाम निघाल्याने शरीरातील जादा मेद जळून जातो, प्रतिकार शक्ती वाढते आणि तुमच्या पायाचे स्नायू बळकट होतात. हा झाला आरोग्याचा फायदा. माझी किंमत तशी माफकच. त्यामुळे तुमचे पैसेही वाचतात. माझ्या दुरुस्तीचा खर्चही फार नाही. शिवाय पेट्रोल, डिझेलचा प्रश्न नाही. मला थांबविण्यासाठी जागा कमी लागते. प्रदूषण होत नाही. पॅरिससारख्या अनेक शहरात आज हजारो लोक माझा आनंदाने वापर करतात.

अरे हो, मीही आता बरीच आधुनिक झाले आहे. मुळातली मी बिनगिअरची; पण आता मला गिअरसुद्धा लागले आहेत. शर्यतीसाठी माझी बांधणी वेगळी असते अन् पर्यटनासाठी वेगळी. जशी तुमची आवड तशी करा माझी निवड ! चला तर मग धूम ठोकूया.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## अभ्यास

**नवीन शब्दार्थ :**

लाभ = फायदा

कार्यक्षम = कर्तबगार

प्रतिकार = विरोध

पर्यटन = फिरस्ती, प्रवास

धूम ठोकणे = पळ काढणे

**अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1) सायकलचा जन्म केव्हा झाला ?

2) सायकलचे जन्मदाते कोण ?

3) सायकल दुरुस्तीचा खर्च कसा आहे?

4) कोणत्या देशात लोक सायकलचा जास्त उपयोग करतात ?

### आ) विरुद्धार्थी शब्द लिहा.

1) तंदुरुस्त ×
2) आनंद ×
3) आवड ×
4) लाभ ×
5) बळकट ×

### इ) खालील शब्दगटाला एक शब्द द्या.

1) वांगे, भेंडी, दोडका, कारले-
2) आंबा, संत्री, चिकू, मोसंबी-
3) रिक्षा, ट्रक, बस, जीप-
4) मांजर, कुत्रा, बैल, गाय-
5) मोगरा, गुलाब, चाफा, जाई-

### ई) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1) __________ यांनी रबरी टायरचा शोध लावला.
2) मला चालविल्याने __________कार्यक्षम होतात.
3) __________ थांबविण्यासाठी जागा कमी लागते.
4) __________ साठी माझी बांधणी वेगळी असते.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## भाषाभ्यास

### I. खालील नमुन्याप्रमाणे जोडशब्द तयार करा.

नमुना : काम - धंदा

1) लपत __________
2) __________ दार
3) __________ कचरा
4) पाला __________
5) इकडे __________
6) चहा __________

**II. खालील अक्षरांचा योग्य क्रम जुळवून वाहनांची नावे लिहा.**

1) आगागडी-　　　　2) मानवि-

3) हाजज-　　　　4) लसाकय-

5) रटामो-

## उपक्रम

**1. खाली दिलेल्या वाहनांची विभागणी करा.**

(जहाज, बोट, पाणबुडी, रॉकेट (अग्निबाण), रिक्षा, विमान, मोटार, रेल्वे, सायकल)

| जमिनीवरून धावणारी वाहने | आकाशात उडणारी वाहने | पाण्यातून चालणारी वाहने |
|---|---|---|
| | | |

2. सायकल शिकताना तुम्हांला आलेला अनुभव आठ ते दहा वाक्यात लिहा.
3. विविध प्रकारच्या सायकलींच्या चित्रांचा संग्रह करा.



### सारे हसूया

एक प्रवासी : तुमच्या गावात कोणी मोठा माणूस जन्मला आहे का ?

मुलगा : नाही, आमच्या गावात फक्त लहान मुलेच जन्मतात. मग ती हळूहळू मोठी होतात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

शब्दातील शेवटचे अक्षर घेऊन शब्दांची दहीहंडी तयार करा.




@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

# वचन

'वचन' म्हणजे बोलणे. नामाच्या ठिकाणी संख्या सुचविण्याचा जो गुणधर्म असतो, त्या गुणधर्माला व्याकरणात 'वचन' असे म्हणतात.

नामावरून जसे लिंग समजते तसे संख्येवरून 'वचन' समजते.

मराठीत वचनाचे दोन प्रकार आहेत.

* वचनाचे प्रकार -
  1) एकवचन
  2) अनेकवचन

* एकवचन

जेव्हा एका वस्तुचा बोध होतो तेव्हा त्याला एकवचन असे म्हणतात.

उदा : मासा, गाय, फूल, मुलगा इत्यादी

* अनेकवचन

जेव्हा एकापेक्षा अधिक वस्तूंचा बोध होतो तेव्हा त्याला अनेकवचन असे म्हणतात.

उदा : मासे, गायी, फुले, मुलगे इ.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकवचन | पोपट | | चिमणी | | कोंबडा | | शिंक | |
| अनेकवचन | | खारी | | वह्या | | गायी | | शेपट्या |

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

## अ) खालील शब्दातील फरक लक्षात घ्या.

(अ)

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| घर | घरे |
| चावी | चाव्या |
| नदी | नद्या |
| खुर्ची | खुर्च्या |
| वेल | वेली |
| फूल | फुले |
| पुस्तक | पुस्तके |

(ब)

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| वृक्ष | वृक्ष |
| डोंगर | डोंगर |
| देव | देव |
| लाडू | लाडू |
| गहू | गहू |
| केस | केस |
| खांब | खांब |

यावरून आपल्या असे लक्षात येईल की, काही शब्दांचे अनेकवचन करताना शब्दात कोणताच बदल होत नाही. (ब) गटातील शब्द पुन्हा एकदा वाचा, म्हणजे आपल्या लक्षात येईल.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**आ) कंसातील योग्य शब्द वापरून वाक्ये पूर्ण करा.**

1) सायकलीला दोन __________ असतात. (चाक/चाके)

2) ताईने मुलांना __________ दिल्या. (पिशवी/पिशव्या)

3) सुताराने खिडकीला __________ बसविली. (काच/काचा)

4) सरांनी मला __________ शिकविला. (धडा/धडे)

5) गवंड्याने __________बांधली. (भिंत/भिंती)

6) राजाने पन्नास __________ आणले. (घोडा/घोडे)

7) हत्तीने __________ उचलून आणला. (ओंडका/ओंडके)

8) झाडावर __________ फुलली. (फूल/फुले)

9) खिडक्यांना नवीन __________ लावले. (पडदा/पडदे)

10) आईने मला खायला __________ दिली. (पुरी/पुऱ्या)

## इ) खालील शब्दांचे अनेकवचन लिहा.

| एकवचन | अनेकवचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|
| वीट | ________ | पान | ________ |
| चिंच | ________ | दरवाजा | ________ |
| नदी | ________ | खिडकी | ________ |
| काठी | ________ | मूल | ________ |
| भाजी | ________ | मुलगी | ________ |
| भाकरी | ________ | पाखरू | ________ |
| तलवार | ________ | गाणे | ________ |
| झाड | ________ | दिवा | ________ |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## ई) चित्र पहा आणि लिहा:

### एक-अनेक ओळखूया

एक

अनेक



पुस्तक



पुस्तके



________



________

 ____________

 ____________

 ____________

 ____________

 ____________

 ____________

 ____________

 ____________

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

E8H8Y8

## पाठ - 7

# उठा राष्ट्रवीर हो

उठा राष्ट्रवीर हो
सज्ज व्हा उठा चला, सशस्त्र व्हा उठा चला
उठा राष्ट्रवीर हो.

युद्ध आज पेटले, जवान चालले पुढे
मिळूनी सर्व शत्रूला क्षणात चारूया खडे
एकसंघ होऊनी लढू चला लढू चला.
उठा उठा, चला चला.

वायुपुत्र होऊनी धरू मुठीत भास्करा
होऊनी अगस्तीही पिऊनी टाकू सागरा
रामकृष्ण होऊया, समर्थ होऊया चला
उठा उठा, चला चला.

चंद्रगुप्त वीर तो, फिरुनी आज आठवू
शूरता शिवाजींची नसानसांत साठवू
दिव्य ही परंपरा अखंड चालवू चला
उठा उठा, चला चला.

यज्ञकुंड पेटले प्रचंड हे सभोवती
दुष्ट शत्रू मारूनी तयात देऊ आहुती
देवभूमी ही अजिंक्य दाखवू जगा चला
उठा उठा, चला चला.

© KTBS
NOT TO BE REPUBLISHED

## नवीन शब्दार्थ

* राष्ट्र = देश
* सशस्त्र = शस्त्रे घेऊन तयार राहणे
* सज्ज होणे = तयार असणे
* युद्ध = लढाई
* वायुपुत्र = बलशाली हनुमानाचे एक नांव.
* अगस्ती = भारतीय पुराणातील एक ऋषी ज्यांनी समुद्र पिऊन आटविला अशी कथा पुराणात सांगितली जाते.
* सागर = समुद्र
* भास्कर = सूर्याचे एक नांव
* समर्थ = शक्तिशाली, बलवान
* प्रचंड = खूप मोठे
* आहुती = बलिदान
* अजिंक्य = जिंकता न येण्यासारखा.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

## समजून घ्या

खालील क्रांतिकारकांची चित्रे पहा. यांच्याबद्दल शिक्षक व पालकांकडून माहिती मिळवा.


भगतसिंग


सुभाषचंद्र बोस


वासुदेव बळवंत फडके


मदनलाल धिंग्रा

## खालील माहिती वाचा. आपल्या पालकांकडून व शिक्षकांकडून समजून घ्या.

* **हनुमान :** भारतीय पुराणामधील एक शक्तिदेवता. पुराणामध्ये अशी कथा सांगितली जाते की हनुमानाने लहानपणी सूर्याला गिळण्यासाठी अवकाशामध्ये उंच झेप घेतली.

* **अगस्ती :** भारतीय पुराणामधील एक तपश्चर्या केलेले ऋषी. पुराणामध्ये अशी कथा सांगितली जाते की अगस्ती ऋषींनी पृथ्वीवरील समुद्राचे सर्व पाणी एका आचमनात पिऊन टाकले होते.

* **चंद्रगुप्त मौर्यः** चंद्रगुप्त मौर्य हा भारतातील एक शक्तिशाली सम्राट. आपले गुरू चाणक्य यांच्या मदतीने भारतामध्ये बलाढ्य मौर्य साम्राज्याची स्थापना केली.

* **छत्रपती शिवाजी महाराज :** भारतातील हिंदवी स्वराज्याचे संस्थापक. मोगल व इंग्रजांविरुद्ध कल्पकतेने लढाया जिंकून स्वराज्याची स्थापना केली.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## अभ्यास

### अ) खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

1) कवी राष्ट्रवीर कोणास म्हणतात ?

2) कवीने कसे लढावयास सांगितले आहे ?

3) कुणाची शूरता नसानसांत साठविण्याचे आवाहन कवी करीत आहे ?

4) कोण अजिंक्य आहे असे जगाला दाखविले पाहिजे ?

### आ) खालील उदाहरणाचे निरीक्षण करा व समानार्थी शब्द लिहा.

उदा : युद्ध - समर, लढाई

1) सूर्य -

2) वायुपुत्र -

3) शत्रू -

4) सागर -

5) फूल -

6) घर-

## उपक्रम

भारतीय लष्करातील शहीद झालेल्या चार योद्ध्यांची चित्रे जमवा व दिलेल्या जागेत चिकटवा. त्यांची नावे दिलेल्या जागेत लिहून त्यांच्याबद्दल माहिती करून घ्या.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

* देशभक्तिपर गीतांचा संग्रह करा.
* पालकांच्या व शिक्षकांच्या मदतीने तुमच्या परिसरात असलेल्या सैनिक, माजी सैनिक व स्वातंत्र्य सैनिकांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधा.

**विचारधन**

दिवसा मातृभूमीची सेवा करा व रात्री तिच्या कल्याणाची स्वप्ने पहा.

***

# पाठ - 8

# राष्ट्रीय शौर्य पुरस्कार

A4Z5M8



दरवर्षी भारतीय बालकल्याण परिषदेमार्फत शौर्याचे कार्य करणाऱ्या मुलांना राष्ट्रीय शौर्य पुरस्कार देण्यात येतो. 16 वर्षांखालील 25 मुलांना हा पुरस्कार देण्यात येतो. या पुरस्काराची सुरुवात 1957 साली भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे प्राण वाचविणाऱ्या मुलाला देऊन करण्यात आली.

2 ऑक्टोबर 1957 रोजी दिल्ली येथील रामलीला मैदानात रामलीलेचा कार्यक्रम पाहण्यासाठी पंडित नेहरू, इंदिरा गांधी, जगजीवनराम इ. मान्यवर उपस्थित होते. यावेळी अचानक शामियान्याला आग लागली. तेव्हा 14 वर्षीय हरिश्चंद्र मेहरा या स्वयंसेवकाने प्रसंगावधानाने स्वत:कडील चाकूने शामियान्याचे दोर कापले, व सर्व उपस्थित मान्यवरांना या अपघातातून वाचविले. मात्र हे कार्य करताना हरिश्चंद्राचे हात भाजले. या धाडसी मुलाचे पंडित नेहरूंना कौतुक वाटले आणि अशा धाडसी मुलांना पुरस्कार देण्याची योजना सुरू झाली. या राष्ट्रीय शौर्य पुरस्काराचा पहिला मानकरी हरिश्चंद्र मेहरा हा स्वयंसेवक ठरला.

© NOT TO BE REPUBLISHED



14 नोव्हेंबर (बालदिन) या दिवशी शौर्य पुरस्कार प्राप्त मुलांच्या नावाची घोषणा केली जाते. प्रजासत्ताक दिनाला हा पुरस्कार प्रदान केला जातो. पुरस्कारप्राप्त शूर मुले हत्तीवर स्वार होऊन संचलनात सहभागी होतात. पदक, रोख रक्कम आणि प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप असते. त्याचबरोबर या मुलांच्या पुढील शिक्षणासाठी परिषदेच्यावतीने मदत केली जाते.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

या पुरस्कारामध्ये खालील पाच पुरस्कारांचा समावेश आहे.

1) भारत पुरस्कार (1987 पासून)

2) गीता चोप्रा पुरस्कार (1978 पासून)

3) संजय चोप्रा पुरस्कार (1978 पासून)

4) बापू गायधनी पुरस्कार (1988 पासून)

5) सामान्य राष्ट्रीय शौर्य पुरस्कार ( 1957 पासून)

## नवीन शब्दार्थ :

* शामियाना = कापड बांधून तयार केलेला मोठा तंबू
* स्वयंसेवक = स्वेच्छेने लोकांची सेवा करणारा
* मानकरी = आदरणीय व्यक्ती
* कौतुक = स्तुती, प्रशंसा
* प्रदान करणे = देणे
* स्वार होणे = प्राण्यांच्या पाठीवर किंवा वाहनावर बसणे
* शौर्य = पराक्रम.

## अभ्यास

### अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

1) भारताचे पहिले पंतप्रधान कोण होते ?

2) रामलीलेचा कार्यक्रम कोणत्या मैदानात सुरू होता ?

3) हरिश्चंद्र मेहरा या स्वयंसेवकाचे वय किती होते ?

4) शौर्य पुरस्काराची घोषणा कोणत्या दिवशी केली जाते ?

5) शौर्य पुरस्काराची सुरूवात केव्हा करण्यात आली ?

### आ) खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

1) शौर्य पुरस्कार केव्हा व कसा प्रदान करण्यात येतो ?

2) शौर्य पुरस्कारामध्ये कोणकोणत्या पाच पुरस्कारांचा समावेश आहे ?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## इ) समानार्थी शब्द लिहा.

1) मैदान

2) प्राण

3) आग

4) शौर्य

5) दिन

## ई) खालील शब्दसमूह वाचा व असे आणखी शब्द शोधून लिहा.

1) सेवा करणारा - सेवक

2) पुस्तके वाचणारा - ____________

3) पालन करणारा - ____________

4) गाणी गाणारा - ____________

5) शिक्षण देणारा - ____________

6) याचना करणारा - ____________

## उ) 'सेवक' हा शब्द जोडून नवीन शब्द बनवा व शिक्षकांकडून अर्थ समजून घ्या.

उदा : स्वयं 'सेवक' = स्वयंसेवक

1) देश ____________

2) समाज ____________

3) ग्राम ____________

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**उपक्रम :**

1) राष्ट्रीय शौर्य पुरस्कार मिळालेल्या धाडसी मुलांची माहिती मिळवून वाचा.

2) 'वीर बापूराव गायधनी' यांची माहिती मिळवा.

**विचारधन**

* मोठेपण हे वयावरून सिद्ध होत नाही, तर ते कर्तृत्वाने सिद्ध होते.

***

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

# लिंग

नामाच्या रूपावरून एखादी वस्तू पुरुषजातीची आहे, की स्त्रीजातीची आहे, की दोन्हींपैकी कोणत्याच जातीची नाही हे समजते त्याला 'लिंग' असे म्हणतात.

मराठी भाषेत लिंगाचे तीन प्रकार पडतात.

1) पुल्लिंग

2) स्त्रीलिंग

3) नपुसकलिंग

1) **पुल्लिंग :** ज्या नामावरून पुरुषजातीचा बोध होतो, त्यास 'पुल्लिंग' असे म्हणतात.

उदा : मुलगा, बैल, घोडा, सूर्य, पंखा, शिक्षक, वाघ इ.

2) **स्त्रीलिंग :** ज्या नामावरून स्त्रीजातीचा बोध होतो त्यास 'स्त्रीलिंग' असे म्हणतात.

उदा : मुलगी, गाय, शाळा, शिक्षिका, वही इ.

3) **नपुसकलिंग :** ज्या नामावरून पुरूषजाती अथवा स्त्रीजाती यापैकी कोणत्याच जातीचा बोध होत नाही त्यास 'नपुसकलिंग' असे म्हणतात.

उदा : पुस्तक, घर, झाड, पाखरू, घड्याळ इ.

मुलगा खेळतो. मुलगी खेळते

बैल गवत खातो. गाय गवत खाते.

वरील दोन्ही वाक्यात नामाच्या लिंगासोबत क्रियापदाचे रूप बदलले आहे.

खेळतो - खेळते

खातो - खाते

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## ✻ कंसात दिलेल्या शब्दाचे लिंगानुसार योग्य रूप लिहा.

उदा : अश्विनी शाळेला - (निघाला, निघाली)

अश्विनी शाळेला निघाली.

1) गणेश पत्र लिहीत ____________ (होती, होता)

2) सुधा पुस्तक ____________ (वाचते, वाचतो)

3) गौतम गाणे ____________ (गाते, गातो)

4) ती नाच ____________ (करतो, करते)

5) अमित गावाला ____________ (गेली, गेला)

## ✻ खाली दिलेल्या तक्त्याचा वापर करा व वाक्ये लिहा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

उदा : मी चित्र काढते.

| | | |
|---|---|---|
| मी<br>आम्ही<br>तू<br>तुम्ही<br>तो<br>ती<br>ते | चित्र | काढते.<br>काढतो.<br>काढतोस.<br>काढता.<br>काढतात. |

**✲ कंसातील सूचनेप्रमाणे वाक्ये बदलून पुन्हा लिहा.**

1) आकाशात ढग दाटून येताच मोर नाचू लागला.

('मोर' ऐवजी 'मुले' हा शब्द घ्या)

2) साप दिसताच तो घाबरला.

('तो' ऐवजी 'ती' हा शब्द घ्या)

3) आरती पुस्तक वाचते.

('आरती' ऐवजी 'कुमार' शब्द घ्या)

**✲ वर्तुळात दिलेल्या शब्दांचा वापर करून वाक्ये बनवा व लिंगानुसार कसा बदल होतो ते पहा.**

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



## * रिकाम्या जागी दिलेल्या शब्दाचे लिंग बदलून लिहा.

1) भाऊ ________________

2) ________________ राणी

3) आई ________________

4) ________________ पत्नी

5) चिमणा ________________

6) ________________ शिक्षिका

7) वाघ ________________

8) ________________ लेखिका

9) कोंबडा ________________

10) मित्र ________________

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

***

# पाठ - 9

## प्राण्यांचा आजार

एक दिवस अवचित घडले
सारे प्राणी आजारी पडले ।।

कोल्होबाला आला ताप
चालताना त्याला लागली धाप ।।

माकडाला झाला खोकला
उडी मारताना त्याचा नेम चुकला ।।

उंटाला झाली भरपूर सर्दी
नाकात झाली शिंकांची गर्दी।।

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED



ससोबाचे अंग दुखू लागले
कोवळे गवत त्याला कडू लागले ।।

घोड्याचा लचकला पाय
तीन पायाने पळणार काय ।।

जिराफाच्या पोटात आली कळ
उभे राहायचं राहिलं नाही बळ ।।

डॉक्टर हरणाला प्राण्यांनी बोलावले
त्यांने लगेच उपचार सुरू केले ।।

तेवढ्यात सिंहगर्जना झाली
हरणासह मंडळी दूर पळाली ।।

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

कवी - श्री विठ्ठल गावडे (पारवाडकर)



## नवीन शब्दार्थ

अवचित = अचानक

लचकणे = मुरगळणे, दुखावणे

बळ = ताकद, शक्ती

## अभ्यास

### अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1) कोल्होबाला धाप का लागली?

2) कोणाचा नेम चुकला ?

3) सशाला काय कडू लागले ?

4) उंटाला काय झाले ?

5) सारी मंडळी कुठे पळाली ?

### आ) खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा.

1) डॉक्टर हरणाला प्राण्यांनी का बोलावले ?

2) सिंहगर्जना झाल्यावर काय घडले ?

### इ) तालबद्ध शब्दांच्या जोड्या बनवा.

उदा : घडले - पडले

ताप -

खोकला -

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

सर्दी -

पाय -

कळ -

**ई) कंसात दिलेल्या यादीतून प्राणी व पक्ष्यांचे आवाज ओळखून लिहा.**

**(आरवणे, भुंकणे, किलबिल, डरकाळी, चिवचिव, गर्जना, गुणगुण, हंबरणे)**

उदा : कोंबड्याचे - आरवणे

1) गायीचे

2) सिंहाची

3) चिमणीची

4) कुत्र्याचे

5) पक्ष्यांची

6) वाघाची

7) डासांची

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**उपक्रम**

* **या कवितेमध्ये वर्णन केलेल्या प्राण्यांची चित्रे जमवा व त्याबद्दल थोडक्यात माहिती लिहा.**

* **खाली दिलेल्या यादीतून जंगली प्राणी व पाळीव प्राणी यांची वेगवेगळी यादी करा -**

  (वाघ, कुत्रा, अस्वल, शेळी, बैल, मांजर, सिंह, हत्ती, गाय, कोल्हा, म्हैस, रेडा, लांडगा)

| पाळीव प्राणी | जंगली प्राणी |
| --- | --- |
| ______________ | ______________ |
| ______________ | ______________ |
| ______________ | ______________ |
| ______________ | ______________ |
| ______________ | ______________ |
| ______________ | ______________ |

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

*** तुमच्या घरी असलेल्या किंवा तुम्ही पाहिलेल्या पाळीव प्राण्याचे चित्र काढा.**

**खालील मुद्द्यांच्या आधारे कथा पूर्ण करा. यातील गंमत म्हणजे स्वतःच्या मनासारखी कथा तयार करता येईल. कथा तयार करा आणि वर्गात सगळ्यांना ऐकवा. तयार केलेल्या कथेला शीर्षक द्या.**

मुद्दे : घनदाट जंगल ____ वाघ आणि त्याचं पिल्लू ____ पिल्लू बोलत नाही बोलायला शिकवण्यासाठी मांजराची नेमणूक ____ म्याँव, म्याँव शिकवण्याचा प्रयत्न ____ वाघोबा वैतागतो ____ आता शिकवायला गाढवदादा येतो ____ तो खिंकाळायला सुरुवात करतो ____ पुन्हा वाघोबाचा वैताग आणि पिल्लू हैराण. तिसऱ्यावेळी गाईची नेमणूक ____ हंबरायला सुरुवात करते ____ वाघोबाचा वैताग वाढतो ____ एक दिवस पिल्लू जंगलात फिरते ____ दबा धरून बसलेला शिकारी ____ पिल्लावर बंदुकीचा नेम धरतो ____ पिल्लू डरकाळी ____ शिकारी धूम ठोकतो ____ वाघोबा खूश होतो.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED




@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

## सारे हसूया



ज्युली : माणसांपेक्षा प्राण्यांचे डोळे चांगले असतात.

तेजस : हो का ! कशावरून?

ज्युली : मी कुठल्याही प्राण्याने चष्मा लावलेला बघितला नाही.

***

# विरामचिन्हे

आपण बोलत असताना अधून-मधून थांबतो. कधी वाक्य पूर्ण झाले म्हणून तर कधी विशिष्ट भाव व्यक्त करण्यासाठी. बोलणे अर्थपूर्ण होण्यासाठी आपण कमी अधिक वेळ थांबतो. या थांबण्याला 'विराम' म्हणतात. आपले हे बोलणे लिहून दाखवावयाचे असेल तर हे विराम वेगवेगळ्या चिन्हांनी दाखवावे लागतात. या चिन्हांना 'विरामचिन्हे' म्हणतात.

**आपल्या मराठी भाषेतील महत्त्वाची विरामचिन्हे खालीलप्रमाणे-**

| क्र. | चिन्हाचे नांव | चिन्ह | केव्हा वापरतात | उदाहरण |
|---|---|---|---|---|
| 1 | पूर्णविराम | . | 1) विधान किंवा वाक्य पूर्ण झाले हे दर्शविण्यासाठी<br>2) शब्दांचा संक्षेप दाखविण्यासाठी अक्षरापुढे. | 1) मी शाळेला जातो.<br>2) इ. = इत्यादी<br>उदा. = उदाहरण |
| 2 | अर्धविराम | ; | दोन छोटी छोटी वाक्ये उभयान्वयी अव्ययांनी जोडली असताना. | ढग खूप गर्जत होते; पण पाऊस पडला नाही. |
| 3 | स्वल्पविराम | , | 1) एकाच जातीचे शब्द लागोपाठ आल्यास<br>2) संबोधन दर्शविताना | 1) हुशार, अभ्यासू, खेळकर व आनंदी मुले सर्वांना आवडतात.<br>2) मधू, इकडे ये. |
| 4 | प्रश्नचिन्ह | ? | प्रश्नार्थक वाक्याच्या शेवटी | तू गावी कधी जाणार? |
| 5 | उद्गारवाचक चिन्ह | ! | भावना व्यक्त करताना ती दाखविणाऱ्या शब्दाच्या शेवटी | अरेरे! खूप वाईट झाले.<br>शाब्बास! छान खेळलास. |
| 6 | अवतरण चिन्ह | " "<br>' ' | (दुहेरी) बोलणाऱ्याच्या तोंडचे शब्द दाखविण्याकरिता.<br>1)एकेरी) एखाद्या शब्दावर जोर द्यावयाचा असल्यास<br>2) पुस्तकाचे नाव वगैरे | तो म्हणाला, "मी येईन".<br>शिवाजी सावंत यांची 'छावा' कादंबरी प्रसिद्ध आहे. |

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

*** वाचा व विरामचिन्हांसह उतारा समजून घ्या.**

परी आजीला म्हणाली, ''बघ ना आजी, आपला मोरू मला चिडवतो.'' ''अरे मोरू इकडे ये.'' आजी म्हणाली. मोरू आजीकडे आला. ''काय गं आजी ?'' मोरू म्हणाला. ''अरे तुम्ही दोघे बहीणभाऊ. मग आपल्या ताईला का चिडवतोस ?'' आजी म्हणाली. ''अस्सं आहे होय!'' मोरू मनाशीच म्हणाला. ''अगं आजी आम्ही दोघे खेळतो तासभर. तू बघ कोण काय कसं ते. मग बोल मला. म्हणतात ना, 'हातच्या कांकणाला आरसा कशाला?'' मोरू म्हणाला.

*** वाचा. समजून घ्या. कंसातील विरामचिन्हे योग्य ठिकाणी वापरून उतारा पुन्हा लिहा. ( . '' '' ! ? ,)**

गांधीजींचे मित्र एकदा त्यांना भेटायला आले. दोघांनी गप्पागोष्टी केल्या. गांधीजींचे लक्ष मित्राच्या धोतराकडे गेले ते मित्राला म्हणाले अरे इतका श्रीमंत झालास पण तुझे धोतर फाटके मित्र म्हणाला अरे भाई श्रीमंतालाही काही अडचणी असतात. गांधीजी म्हणाले फाटके धोतर नेसण्याइतकी काय अडचण आली मित्र म्हणाला नोकर काम करत नाहीत हे ऐकून गांधीजींनी लगेच त्याचे धोतर शिवून दिले हे पाहून तो श्रीमंत गृहस्थ गांधीजींना काय सांगायचे आहे ते समजून गेला.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

***

## यक्षगान

# कर्नाटकातील लोककला




'यक्षगान' हा कर्नाटकातील नृत्यनाट्याचा कलाप्रकार आहे. या अभिजात नृत्यनाट्य शैलीमध्ये नृत्य, अभिनय, वेशभूषा यांचा संगम आहे. कर्नाटकाच्या सांप्रदायिक कलाप्रकारांमध्ये हा प्रमुख कला प्रकार गणला जातो. यक्षगानाला इ. स. च्या सतराव्या शतकापासूनचा जुना इतिहास आहे. आधुनिक काळात कोटा शिवराम कारंत यांनी या कलेस पुनरुज्जीवित केले. कर्नाटकाच्या किनारी भागातील उत्तर कन्नड, दक्षिण कन्नड जिल्हा आणि उडुपी हे जिल्हे व घाटावरील शिमोगा, चिक्कमंगळूर व केरळातील कासरगोड जिल्ह्यांमध्ये यक्षगानाचा प्रामुख्याने प्रसार आहे.

# गोमू माहेरला जाते

गोमू माहेरला जाते हो नाखवा
तिच्या घोवाला कोकण दाखवा... ।।धृ।।

दावा कोकणाची निळी निळी खाडी
दोन्ही तीराला हिरवी हिरवी झाडी
भगवा अबोली फुलांचा हो ताटवा
तिच्या घोवाला कोकण दाखवा... ।।१।।

कोकणची माणसं साधी भोळी
त्यांच्या काळजात भरली शहाळी
उंची माडांची जवळून मापवा
तिच्या घोवाला कोकण दाखवा... ।।२।।

सोडून दे रे खोड्या साऱ्या
शिडात शिर रे अवखळ वाऱ्या
झणी धरणीला गलबत टेकवा
तिच्या घोवाला कोकण दाखवा... ।।३।।

**शिक्षकांना सूचना :**

ही गीते केवळ पाठांतरासाठी आहेत. नृत्य स्वरूपात विद्यार्थांकडून करवून घ्यावीत.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED